# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**


**Case No: CGRF /AZ /U / 111 / 2008 / 32/ Date:-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Smt. Farooqui Ruquia Sk..Hassan, House No.13, Bari Colony, Roshangate, Aurangabad. ( Consumer No. 490010744048 )

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Smt. Farooqui Ruquia Sk..Hassan, House No.13, Bari Colony, Roshangate, Aurangabad.

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter

**The hearing of the grievance is fixed on date 08.07.2008 at 12.30 Hrs.**

**Encl As above**.

Copy to :-

**Smt. Farooqui Ruquia Sk.Hassan.**
House No.13, Bari Colony, Roshangate,
**Aurangabad.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/अेयुआर/यू/१११/२००८/३२**
**तक्रार दाखल दिनांक ;-२४/०६/२००८**
**निकाल दिनांक ;-२२/०७/२००८**

**श्रिमती फारुखी रुखिया शेख हसन,**
**घर क्र, १३, बारी कॉलनी, रोशनगेट,**
**किराडपुरा, औरंगाबाद.**

अर्जदार/ग्राहक

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर मंडळ, औरंगाबाद.**

**विषय ;- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल)विनियम २००६च्या अंतर्गत गा-हाणे.**

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र. विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार

दाखल केली आहे. अर्जदाराने केलेल्या गा-हाण्याची प्रत दिनांक २४/०६/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे नोडल अधिकारी, यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले व सुनावणीची तारीख दिनांक ०८/०७/२००८ रोजी ठेवण्यात आली.

१)ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे.

अर्जदाराने घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्याचा ग्राहक क्रमांक ४९००१०७४४०४८ असा आहे. त्याने डिसेंबर २००७ पर्यंत बिल भरलेले आहे.त्यांना जानेवारी २००८ च्या बिलात २९६६ युनिट वापराचे व रु.१८९१०/-चे वीज बिल आकारण्यात आले. याबाबत त्यांनी महावितरण कंपनीच्या संबंधीत अधिका-याकडे तक्रार केली पण त्यांच्या तक्रारीची दखल घेतली गेली नाही म्हणुन त्यांनी मंचात तक्रार दाखल केली आहे व सुधारीत वीज बिल देण्याबाबतचे आदेश देण्याची विनंती केली आहे.

२) दिनांक ०८/०७/२००८ रोजी ग्राहक प्रतिनीधी श्री मोहम्मद मुजिब फारुखी तसेच नोडल अधिका-यांचे प्रतिनीधी श्री आय.जी. बोराडे,सहाय्यक अभियंता, शहर मंडळ औरंगाबाद हजर होते.नोडल अधिकारी यांनी सुनावणीची पुढिल तारीख देण्याची विनंती केली व मंचाने विनंती मान्य करून पुढील सुनावणी दि.१५/०७/२००८ रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक १५/०७/२००८ रोजी ग्राहक प्रतिनीधी श्री मोहम्मद मुजिब फारुकी तसेच नोडल अधिकारी श्री जी. एस. राठोड, श्री कमरुददीन उप-कार्यकारी अभियंता, शहागंज उप-विभाग व श्री आय.जी. बोराडे,सहाय्यक अभियंता, शहर मंडळ औरंगाबाद हजर होते.सुनावणीच्या वेळी नोडल

अधिका-यानी दाखल केलेल्या जबाबात मिटर रिडरच्या चुकीने अर्जदारास जानेवारी २००८चे २९६६ युनिट वीज वापराचे व रु.१८९१०/-चे वीज बिल आकरण्यात आल्याचे म्हटले आहे.अर्जदारास देण्यात आलेले वीज बिल चुकीचे असल्याचे मान्य करून त्यांनी दि.११/०७/२००८ रोजी हे मिटर बदलण्यात आल्याचे सांगितले. मे. युनिव्हर्सल ट्रान्सफॉर्मरच्या अहवालानंतर सुधारीत बिलाचा तपशील तयार केला असून तो त्यांनी सुनावणीच्या वेळी मंचात दाखल केला तसेच अर्जदारास जुन्या मिटरच्या अंतिम रिडींगप्रमाणे सुधारित वीज बिल देण्यात आले. सुधारीत बिलात रु.२०१६०/- चे क्रेडिट देण्यात येवून ते रु.९६०/- देय असल्याचे सांगितले.

४) दोन्ही बाजूकडून मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरुन व नोडल अधिकारी यांच्या प्रतिनिधीने दाखल केलल्या सुधारीत बिलाचे अवलोकन केल्यावर मंचास असे आढळून येते की, अर्जदाराचे मीटर हे चालू स्थितीत होते व वीज वापराची योग्य ती नोंद त्यावर होत होती. नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या ग्राहकाच्या सी.पी.एल.वरून त्यांचे नोव्हेंम्बर २००८ महिन्यापर्यंत मिटरवरील नोंदीप्रमाणे वीज बिल भरलेले आहे. जानेवारी २००८ मध्ये देण्यात आलेल्या वीज बिलात मागिल रिडींग ६६९७ व चालू रिडींग ९६६३ अशी दाखविण्यात आली आहे. अर्जदाराच्या मे२००८ च्या बिलात मिटर वरील रिडींगची नोंद मागिल रिडींग ९६६३ अशी असल्याचे दिसून येते व चालू रिडींग १००११आहे.यावरून अर्जदाराचे मिटर हे व्यवस्थितपणे कार्यरत असल्याचे दिसून येते व अर्जदाराचा आक्टोबर २००७ ते दि.११जुलै २००८ या काळातील एकुण वीज वापराचे वीज बिल ९६०/- रुपयाचे आहे जे कि ग्राहकास मान्य आहे. `. महावितरण तर्फे जानेवारी २००८

नंतर चुकीच्या वीज बिलाची आकारणी केल्याचे यावरून स्पष्ट होते अर्जदाराने मंचात दाखल केलेली तक्रार योग्य असून महावितरण कंपनी तर्फे त्यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेण्यात न आल्यामुळे त्यास मंचात तक्रार दाखल करावी लागली.

ग्राहकाच्या गा-हाण्याचे निवारण झाल्यामुळे मंच खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास सुधारीत वीज बिल ३० दिवसाच्या आत द्यावे.

२) व्याज व दंड लावु नये.

३) चुकीचे वीज बिल आकारल्यामुळे कंपनीने ग्राहाकास रूपये १००/- नुकसान भरपाई द्यावी.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **विजय गो. जोशी** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१११/२००८/३२** **दिनांक ;-**

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद.**

**२) श्रिमती फारुखी रुखिया शेख हसन,**
**घर क्र, १३, बारी कॉलनी, रोशनगेट,**
**किराडपुरा, औरंगाबाद.**

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१११/२००८/३२
गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.

सोबत ;- वरिल प्रमाणे.

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा ईमारत,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**